# शासकीय वैद्यकीय महाविद्यालय,नागपूर
## GOVERNMENT MEDICAL COLLEGE, NAGPUR
Tele No.Office 2743588, Fax No.2744489 PBX 2744671 to 75


जा.क्र. शावैमना/महा.खरेदी/निर्लेखन/ 386 /२०१९ दि 07/01/२०१९

**विषय :- निर्लेखीत/निकामी यंत्रसामुग्री व लाकडी साहित्याचे उचल करणेबाबत.**

शासकिय वैद्यकिय महाविद्यालय, नागपूर या संस्थेतील निर्लेखीत करण्यात आलेल्या निकामी यंत्र, उपकरणे, प्रयोगशाळा साहित्य व लाकडी फर्निचर इत्यादी साहित्य आहे त्या स्थितीत विक्री करण्याकरिता ई-दरपत्रकाव्दारे पुरवठादारास आमंत्रित करण्यात येत आहे.

पुरवठादारांनी विविध विभागामध्ये जाऊन विविध साहित्याची पाहणी करुन त्याची उचल करण्याकरीता दर बंद लिफाप्यामध्ये दि.१४.०१.२०१९ ला दुपारी ०४.०० वाजेपर्यंत महाविद्यालय खरेदी विभागामध्ये जमा करण्यात यावे. सोबत निर्लेखन साहित्याची यादी सलग्न करण्यात आलेली आहे. साहित्याची पाहणी झाल्यानंतर खरेदीचे दर लाखडी साहित्याची व यंत्रसामुग्री चे दर वेगवेगळे नमुद करावे.

सदर यादीत नमुद नगांच्या संख्येत बदल करण्याचा, तसेच प्राप्त होणारी अधिकतम दराची रक्कम मानीव किंमतीपेक्षा कमी असल्याचे वाटल्यास ती रदद करण्याचा किंवा संपुर्ण प्रक्रिया रद्द करण्याचा अधिकार अधिष्ठाता यांनी राखुन ठेवलेला आहे.

## निवीदेच्या अटी व शर्ती

१. वर नमुद निर्लेखीत करण्यात आलेल्या फर्निचरची विक्री ज्या स्थितीत आहे त्याच स्थितीत जशाच्या तशा करण्यात येईल. ज्या साहित्याच्या नंगाची संख्या १ पेक्षा अधिक दर्शविलेली आहे त्यांची बनावट, स्थिती भिन्न राहू शकते. त्याच प्रमाणे त्यातील काही फर्निचर तुटफुट/ मोडतोड/ गंजलेल्या/अर्धवट अवस्थेत आहे. त्याबाबत कोणतीही तक्रार स्विकारण्यात येणार नाही.

२. साहित्य पाहण्याची इच्छा आहे त्यांचेकरिता दि.१० जानेवारी, २०१९ व दि.११ जानेवारी, २०१९ ला सकाळी ११ ते १ ही वेळ साहित्य पाहण्याकरिता ठेवण्यात आलेली आहे. साहित्य पाहण्याकरिता लेखी अर्ज सादर करणे आवश्यक राहील. कोणत्याही परिस्थितीत उपरोक्त नमुद तारखे किंवा कालावधीच्या व्यतिरिक्त इतर वेळेस किंवा तारखेस साहित्य पाहण्याची परवानगी देण्यात येणार नाही. साहित्य पाहण्याकरिता फक्त प्रतिनिधीसच प्रवेश देण्यात येईल. साहित्य जेथे ठेवलेले आहे तेथे जाउन पाहवे लागेल. ते एकाच ठिकाणी पाहवायास मिळणार नाही. तसेच त्याची उचल करण्याची जबाबदारी जास्त दर आलेल्या प्रतिनीधी (संस्थेची) राहील.

३. साहित्य पाहण्याची संधी देण्यात येत असल्याने साहित्याची स्थिती किंवा नगाबाबत कोणतीही तक्रार स्विकारण्यात येणार नाही.

४. अधिष्ठाता, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, नागपूर या संस्थेमध्ये बयाना रक्कम रु.३०,०००/- साहित्य उचल करण्यापुर्वी जमा करण्यात यावी.

५. निर्लेखीत/निकामी यंत्रसामुग्री व लाकडी साहित्य उचल करण्याकरीता दर बंद लिफाप्यामध्ये दि.१४.०१.२०१९ ला दुपारी ०४.०० वाजेपर्यंत महाविद्यालय खरेदी विभागामध्ये जमा करण्यात यावे.

अधिष्ठाता,
शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, नागपूर